!! ज्ञानदीप लावू जगी !!

**Aadishakti Dhandai Mata Shikshan Prasarak Sanstha's**

# Late Annasaheb R. D. Deore Arts and Science College

## Mhasadi, Tal. Sakri, Dist. Dhule (MS).

NAAC Accredited B+ Grade (CGPA2.52)



# शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५
# वार्षिक अहवाल

## विदयार्थी विकास विभाग

**शैक्षणिक वर्ष – २०२४-२५**

# शैक्षणिक वर्ष 2024 -2025
# वार्षिक अहवाल

**कबचौ,उ.म.विदयापीठ** अंतर्गत **विदयार्थी विकास विभागामार्फत** राबविण्यात येणा-या व **स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालयाने** सहभाग घेतलेल्या विविध उपक्रमांचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे.

शैक्षणिक वर्ष **2024-2025** मधील विदयार्थी विकास विभागाची प्रथम सभा मा.प्राचार्य प्रो. संजीव बी. गिरासे यांच्या अध्यक्षतेखाली दि**.1**8/07/2024 रोजी घेण्यात आली. सभेत मागील शैक्षणिक वर्षाचा कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच मागिल वर्षी विभागा मार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळांचा यशस्वीतेबाबत समाधान व्यक्त् करुन नुतन शैक्षणिक वर्ष असेच उपक्रम राबवावेत असे मत व्यक्त् करण्यात आले. तसेच विदयार्थी हित लक्षात घेता विदयापीठा मार्फत गरीब होतकरु विदयार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी पात्र विदयार्थ्यांचे अर्ज मागविण्याचे परवानगी देण्यात आली. त्याच प्रमाणे विदयापीठ स्तरीय विविध कार्यशाळा, अविष्कार,युवारंग इ.सारख्या उपक्रमात जास्तीत जास्त् विदयार्थ्यांना सहभागी करुन त्यांचा कला गुणांना वाव मिळावा असे ठरविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष **2024-2025** मध्ये विदयार्थी विकास विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

1- **कमवा व शिका योजना** :

महाविदयालयात गरीब व होतकरु विदयार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या कमवा व शिका योजने साठी विदयापीठ परीपत्रकानुसार 08 विदयार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यास मा.प्राचार्यांच्या शिफारशीने प्रस्ताव तयार करुन विदयापीठाकडे पाठविण्यात आला. या उपक्रमात सहभागी विदयार्थ्यांनी माहे ऑगष्ट २०२४ ते फेब्रुवारी २०२४ या दरम्यान मध्ये महाविदयालय परीसरात बागकाम, रोपलागवड, झाडांना पाणी देणे ,परीसर स्वच्छता ,ग्रथालयीन कामे ,विज्ञान विभागातील प्रयोगशाळा स्वच्छता,कार्यालयीन उपयुक्त् कामे इ.कामकाज केले.त्यांचा कामाचा मेहनाताना म्हणुन १२५०८०/- रुपये एकूण ०८ निवड झालेल्या विध्यार्थांच्या बँक खाती सदर रक्कम वर्ग करून कार्यपूर्ती अहवाल विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला. व त्याच प्रमाणे सेन्ट्रल ऑडीट सुद्धा पूर्ण करून विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला.

2- **आर्थिक दुर्बल घटक योजना** :

विदयापीठामार्फत अपंग, अनाथ, गरीब विदयार्थ्यांसाठी देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी महाविदयालयातील १३ विदयार्थ्यांची निवड करण्यात येवुन तसा प्रस्ताव विदयापीठ विदयार्थी कल्याण विभागात पाठविण्यात आला. या योजनेखाली १३ विदयार्थ्यांना विदयापीठाकडुन ५०५०० /- रुपये मंजुर करण्यात आले व त्याप्रमाणे विध्यार्थांच्या बँक खाती सदर रक्कम वर्ग करून कार्यपूर्ती अहवाल विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला.

3- **आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळा**–

शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला विदयापीठ परीपत्रकानुसार महाविदयालयाने 02 कार्यशाळा आयोजनासाठीचे प्रस्ताव विदयापीठाकडे सादर केले. त्यात मैत्री कार्यशाळा, युवतीसभे अंतर्गत मिशन साहशी अभियान आयोजनेस विदयापीठाने परवानगी दिली.

**तीनदिवशीय मैत्री कार्यशाळा अहवाल**
**दि.02/01/2025 ते दि.04/01/2025**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उद्घाटक | मा. श्री. राजेंद्र नन्नवरे | मा. राज्यपाल नियुक्त व्यस्थापन परिषद सदस्य, कबचौ.उमवि, जळगाव |
| २ | समारोप कर्ते | प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे | समन्वयक, विद्यार्थी विकास विभाग, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ, जळगाव |
| ३ | प्रमुख पाहुणे | मा.डॉ.दादासो.संजयकुमार आर देवरे मा. श्री. नितीनजी झाल्टे डॉ.शिवाजी बी. पाटील मा. डॉ. ऋषिकेश सुभाष चित्तम प्रा. डॉ. धिरज वैष्णव मा.सौ. स्वप्नाली महाजन | अध्यक्ष, आ. ध. मा. शिक्षण प्रसारक संस्था, धुळे सदस्य, व्यस्थापन परिषद कबचौ. उमवि, जळगाव सदस्य, व्यवस्थापन परिषद क.ब.चौ. उ.म.वि.जळगाव अधिसभा सदस्य, क.ब.चौ. उ.म.वि.जळगाव अधिसभा सदस्य, क.ब.चौ. उ.म.विद्यापीठ, जळगाव अधिसभा सदस्य, क.ब.चौ. उ.म.विद्यापीठ, जळगाव |
| ४ | प्रमुख मार्गदर्शक | प्रा. डॉ. योगेश नांद्रे प्रा. डॉ. संजय ढोडरे डॉ. नितीन माळी प्रा.डॉ. रमेश माने प्रा. डॉ. माधव वैभव सबनीस श्री. रोहित ठाकुर प्रा.डॉ. जे.पी.तोरवणे प्रा. डॉ. उमेश गांगुर्डे | अ. मा. पाटील माहाविद्यालय पिंपळनेर अभय महिला महाविद्यालय, धुळे शिक्षणशास्त्र महाविद्यालय नावापुर प्रताप माहाविद्यालय अमळनेर आंबेडकर विधी महाविदयालय धुळे उद्योजक, धुळे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर |

दि. 02/01/2025 ते दि. 04/01/2025 दरम्यान विदयार्थी विकास विभाग कबचौ उ. म. विदयापीठ जळगांव पुरस्कृत व स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालय म्हसदी आयोजित तीनदिवशीय मैत्री कार्यशाळा आमच्या महाविदयालय येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत धुळे नंदुरबार जिल्हातील वेगवेगळया महाविदयालयातुन एकुण 155 विदयार्थ्यांनी उत्साहपुर्वक सहभाग नोंदवला.

या तीनदिवशीय मैत्री कार्यशाळेचे उदघाटन दि. 02/01/2025 रोजी सकाळी ठिक 10.00 वाजता मा. श्री. राजेंद्र नन्नवरे (मा. राज्यपाल नियुक्त व्यस्थापन परिषद सदस्य, कबचौ.उमवि, जळगाव) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. उदघाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.दादासो.संजयकुमार आर देवरे हे उपस्थित होते. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मा. श्री. नितीनजी झाल्टे (व्यस्थापन परिषद सदस्य, कबचौ. उमवि, जळगाव) मा. तात्यासो. यशवंत बळीराम देवरे (अध्यक्ष-धनदाई तरूण ऐक्यमंडळ म्हसदी) मा.भाऊसो.हिम्मतराव दयाराम देवरे (सचिव-धनदाई तरूण ऐक्यमंडळ म्हसदी) तसेच उपप्राचार्य

डॉ.शिवाजी बी. पाटील (सदस्य, व्यवस्थापन परिषद क.ब.चौ. उ.म.वि.जळगाव) मा. डॉ. ऋषिकेश सुभाष चित्तम (अधिसभा सदस्य, क.ब.चौ. उ.म.वि.जळगाव) महाविदयालयाचे प्राचार्य प्रो. संजीव बी. गिरासे उपस्थित होते.

या तीनदिवशीय मैत्री कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक दिवशी एकुण 4 सत्रात करण्यात आले होते. प्रथम दिवशी दि. 02/01/2025 सकाळी प्रथम सत्रात नाव नोंदणी व ठिक 10 वाजता उदघाटनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर द्वितीय सत्रात 11.30 ते 1.00 दरम्यान मा. श्री. नितीनजी झाल्टे व्यस्थापन परिषद सदस्य, कबचौ. उमवि, जळगाव यांनी "विद्यापीठ योजना आणि विद्यार्थी विकास" याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर 1.00 ते 2.00 दरम्यान सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.30 दरम्यान प्रा. डॉ. योगेश नांद्रे अ. मा. पाटील माहाविद्यालय पिंपळनेर यांनी "मैत्री आरोग्याशी" या विषयावर विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. चतुर्थ सत्रात 3.30 ते 5.00 दरम्यान प्रा. डॉ. संजय ढोडरे यांनी "व्यक्तिमत्व" या विषयावर सर्व विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी मनुष्य जिवन मुल्य व माणुसकी या विषयावर विदयार्थीना मंत्रमुग्ध् केले. संध्याकाळी 6.00 ते 7.00 या कालावधीत सर्व विदयार्थ्यांची विविध विषयावर गट चर्चा घडवुन आणण्या आली यातुन विविध महाविदयालातुन आलेल्या विदयार्थ्यांमध्ये परिचय व मैत्री भाव निर्माण झाला. या सत्रानंतर विदयार्थ्यांना विश्राम व भोजन अवकाश देण्यात आला व रात्री 8.00 ते 9.30 दरम्यान विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मैत्री कार्यशाळेच्या दुस-या दिवशी प्रभातकाळी ठिक 6.00 ते 7.00 दरम्यान प्रा. डॉ. योगेश नांद्रे अ. मा. पाटील माहाविद्यालय पिंपळनेर यांनी योगासन व प्राणायम या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर अल्पोहार पश्चयात प्रथम सत्रात 10..00 ते 11.30 दरम्यान प्रा. डॉ. नितीन माळी शिक्षणशास्त्र महाविद्यालय नावापुर यांनी "तुच तुझ्या जिवनाचा शिल्पकार" या विषयावर विदयार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. द्वितीय सत्रात प्रा.डॉ. रमेश माने प्रताप माहाविद्यालय अमळनेर यांनी "मित्र आणि मैत्रत्वाची गरज" या कार्यशाळा पुरक विषयावर विदयार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. त्यानतर दुपारी 1.00 ते 2.00 सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.30 दरम्यान प्रा. डॉ. माधव वैभव सबनीस आंबेडकर विधी महाविदयालय धुळे यांनी "मैत्री पुस्तकांशी" या विषयावर विदयार्थ्यांना अतिशय सुंदर दाखले देत मैत्री मधुन व्यक्तीमत्व विकास कसा साधावा हे पटवून दिले. त्यानंतर चतुर्थ सत्रात श्री. रोहित ठाकुर यांनी "मैत्री वकृत्वाशी"या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर विदयार्थ्यांना परिसरातील शिवारात शिवार मैत्री घडवुन आणण्यात आली. या सत्रानंतर विदयार्थ्यांना विश्राम व भोजन अवकाश देण्यात आला व रात्री 8.00 ते 9.30 दरम्यान विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मैत्री कार्यशाळेच्या तिस-या दिवशी प्रभातकाळी ठिक 7.00 ते 9.00 दरम्यान ध्यानसाधना व ध्वजप्रशिक्षण या अलौकिक विषयावर प्रा.डॉ. जे.पी.तोरवणे क्रिडासंचालक यांनी सत्र बाह्य मोलाचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर अल्पोहार पश्यात प्रथम सत्रात 10..00 ते 11.30 दरम्यान सर्व विदयार्थ्यांची निसर्गाशी मैत्री व्हावी या हेतूने धनदाई मातेच्या कुशीत वसलेल्या डोंगरावर फेरी काढण्यात आली. द्वितीय सत्रात 11.30 ते 1.00 दरम्यान विदयार्थ्यांना समाजाशी मैत्री व्हावी या हेतूने प्रा. डॉ. उमेश गांगुर्डे यांनी "मैत्री अध्यात्माशी" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर दुपारी 1.00 ते 2.00 सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.30 दरम्यान मा. श्री. आबासों गंगाराम सुकलाल देवरे (उपाध्यक्ष-धनदाई तरूण ऐक्यमंडळ म्हसदी)यांनी "मैत्री निसर्गाशी काळाची गरज" या विषयावर विदयार्थ्यांना अतिशय सुंदर दाखले देत मंत्रमुग्ध केले. त्यानंतर चतुर्थ सत्रात मैत्री कार्यशाळेच्या चतुर्थ सत्रात समारोप प्रसंगी **समारोपकर्ते म्हणुन प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे समन्वयक, विद्यार्थी विकास विभाग**, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ, जळगाव, तसेच समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रो. संजीव बी. गिरासे व प्रमुख पाहुणे म्हणुन मा. प्रा. डॉ. धिरज वैष्णव,

अधिसभा सदस्य, क.ब.चौ. उ.म.विद्यापीठ, जळगाव, मा.सौ. स्वप्नाली महाजन, अधिसभा सदस्य, क.ब.चौ. उ.म.विद्यापीठ जळगाव, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळाचे खजिनदार मा. श्री. सुरेश दलीचंद जैन, प्रा. डॉ. शिवाजी बी. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळाचे संचालक माजी अध्यक्ष मा. दादासो. सुभाष गजमल देवरे, मा. श्री दाजी देवरे, मा.श्री के. एन. देवरे आदींच्या उपस्थित समारोप संपन्न झाला.

या तीनदिवशीय मैत्री कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मा.प्राचार्य प्रो.संजीव गिरासे संयोजक प्रा.डॉ.विशाल नारायण शिंदे, संयोजक समिती सदस्य डॉ. मिलिंदकुमार देवरे, प्रा.डॉ.वनिता पवार, प्रा.डॉ. संदीप नांद्रे, प्रा.डॉ. उमेश गवई, प्रा.डॉ. विलास एस. मोरे, प्रा.डॉ. गुलाबसिंग पावरा, तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री.रत्नाकर जाधव, राजेंद्र देवरे व विदयार्थीनी प्रतिनिधी सयली सीताराम पाटील व विद्यार्थ्यी प्रतिनिधी दीपक शशिकांत भामरे यांचे सहकार्य लाभले. विदयार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.व्ही.के.साळुंखे यांनी सर्वांचे आभार माणुन राष्ट्रगीताने कार्यशाळेची सांगता करण्यात आली. विदयार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच गटूनिहाय प्रोहत्सान बक्षिस वितरण करून विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यशाळेच्या यशस्वीते साठी सर्व शिक्षक, शिक्षेकेतर कर्मचारी, धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे कर्मचारी, कमवा व शिका योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी- विदयार्थीनी इत्यादींचे सहकार्य लाभले.

**४- बहिणाबाई अभ्यासिका**

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार बहिणाबाई अभ्यासिकेचा जुलै-२०२४ अहवाल सादर करतांना अत्यंत आनंद होतो की, आमच्या महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये कबचौ उ. म. विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभागा मार्फत कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या गुणगौरव व्हावा या साठी विद्यापीठ परीक्षेत्रातील नियमित शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयातील ग्रामीण व आदिवासी तसेच दुर्गम भागातील होतकरू विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेची व प्रशासकीय सेवांमध्ये संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने परीक्षेची पूर्वतयारी करतांना आवश्यक असणाऱ्या बाबींचा विचार करून एक अभ्यास केंद्र असावे म्हणून **'बहिणाबाई अभ्यासिका'** आमच्या महाविद्यालयातस्थापन करण्यात आली. सदर अभ्यासिकेसाठी विद्यार्थी विकास विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तरमहाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडून जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या आठ महिन्यांसाठी मान्यता देण्यात आली. तसेच ४००००/- रुपये अनुदान मंजूर करण्यात आले.

विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार अभ्यासिकेत स्वतंत्र वाचन कक्षेची निर्मिती करण्यात आली व त्यास **'बहिणाबाई अभ्यासिका'** हे नाव देण्यात आले. सदर अभ्यासिकेत विद्यार्थ्यांना बसण्याची उत्तम व्यवस्थ, वीजपुरवठा व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले. या अभ्यासिकेचा लाभ दररोज १० ते २० विद्यार्थी वाचन कक्षात बसून घेत असतात. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंच ग्रुपवर अभ्यासिके संदर्भात सूचित केले असता काही माजी विद्यार्थी या योजनेचा रोज लाभ घेत आहेत.

या अभ्यासिकेची व्यवस्था शिक्षेकेतर कर्मचारी श्री रत्नाकर जाधव यांच्यावर सोपविण्यात आली असून त्यांना दरमहा १००० * ८ = ८००० /- रुपये मानधन देण्याचे ठरले. तसेच स्वछतादूत मनीष पवार ७०० * ८ = ५६००/- रुपये, योजनेचे समन्वयक प्रा. विठ्ठल साळुंखे यांचे मानधन १००० * ८ = ८००० /- रुपये अदा करण्याचे ठरले. या अभ्यासिकेसाठी महाविद्यालयाने प्रशांत पब्लिकेशन, जळगाव यांचा कडून ६५४१/- रुपयांची

व अथर्व पब्लिकेशन यांच्या कडून ६१००/- ची नवीन पुस्तक खरेदी करण्यात आली. तसेच लोकसत्ता, अग्रो, लोकमत टाईम्स, टाईम्स ऑफ इंडिया तसेच स्पर्धा परीक्षा, चाणक्य ही मासिके व वर्तमान पत्र इत्यादी सुरू करण्यात आले.

या अभ्यासिकेच्या निमित्ताने सदर विद्यार्थ्यांना भविष्यात त्यांचे भविष्य घडविण्यात निश्चितच हातभार लागेल. ह्या उदत्त हेतूने प्रेरित होऊन आमच्या महाविद्यालयाने बहिणाबाई अभ्यासिका योजना राबवली आहे.

**५- विविध उपक्रमात सहभाग-**

| **अ. न.** | **उपक्रमाचे नाव** | **विद्यार्थी संख्या** | **ठिकाण** |
|---|---|---|---|
| **१** | **युवारंग -२०२४** | **०७** | **उ. म. विद्यापीठ , जळगाव** |
| **२** | **मैत्री कार्यशाळा** | **०६** | **कला विज्ञान महाविद्यालय, म्हसदी** |
| **३** | **युवती सभा** | **१०** | **एन. एन. सी. महाविद्यालय, कुसुंबा** |
| **४** | **ताणतणाव मुक्त कॉपी अभियान** | **१०** | **सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री** |

**विद्यार्थी विकास् अधिकारी** **प्रो. डॉ. संजीव बी. गिरासे**

A.D.M.S.P. Sanstha's R.D. Deore Arts & Science College, Mhasadi Tal. Sakri Dist. Dhule — Estd. Date 1st July 1996